**जिल्हा परिषद, वर्धा**
**कार्यालय : सामान्य प्रशासन विभाग,**
**सिव्हील लाईन, वर्धा- 442001**

**दुरध्वनी क्र.** 07152-243211/ 243889 **ई-मेल** :- dyceogenzpwardha@gmail.com

---

**क्र.जिपव/साप्रवि/आस्था-1/प्र.क्र.08/2026 वशि-277 /2026 E-mail द्वारे** **दिनांक :- 06 एप्रील,2026**

**अत्यंत महत्त्वाचे/ तात्काळ /सार्वत्रिक बदल्या सन-2026**

**प्रति,**

1) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, वर्धा
2) ----------------------------------------(खातेप्रमुख),जिल्हा परिषद, वर्धा
3) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, ----------------(सर्व)

**विषय : सार्वत्रिक बदल्या सन-2026 करीता विनंती अर्ज विहीत नमुन्यांत सादर करणेबाबत.**

**संदर्भ** :1.ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र.जिपब-414/प्र.क्र.122/आस्था-14,दिनांक 15 मे,2014
2. ग्राम विकास विभाग,शासन शुद्धीपत्रक क्रमांक: जिपब-414/प्र.क्र.112/आस्था-14 दि.02 जुलै,2014
3. ग्राम विकास विभाग,शासन शुध्दीपत्रक क्र.जिपब-4816/प्र.क्र.136/आस्था-14, दि.02 जानेवारी,2017
4. ग्राम विकास विभाग शासन पुरकपत्र क्रमांक:जिपब-4817/प्र.क्र.228/आस्था-14 दि. 07 मार्च,2019
5. उप सचिव, महा.शा.ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांचे पत्र क्र.संकीर्ण-2019/प्र.क्र.800/आस्था-7 दि.08 जानेवारी,2020
6. उप सचिव,महा शासन ग्राम विकास विभाग पत्र क्र.संकीर्ण2023/प्र.क.127/आस्था-14 दि.18 मे,2023
7. ग्राम विकास विभाग शासन पुरकपत्र क्रमांक:जिपब-4817/प्र.क्र.228/आस्था-14 दि. 28 मार्च,2025
8. ग्राम विकास विभाग,शासन शुध्दीपत्रक क्र.जिपब-1125/प्र.क्र.125/आस्था-14, दि.23 मे,2025
9. ग्राम विकास विभाग शासन पुरकपत्र क्रमांक:बैठक-4825/प्र.क्र.106/आस्था-14 दि. 09 सप्टेंबर,2025
10. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.वर्धा यांचे कार्यालयीन परिपत्रक क्र.जिपव/साप्रवि/आस्था-01/प्र.क्र08/2026 वशि-70/2026 दिनांक 10.01.2026.

जिल्हा परिषदेच्या गट-क (वर्ग-3) व गट-ड (वर्ग-4) संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या बदल्यांबाबतचे धोरण ग्राम विकास विभागाच्या संदर्भाधिन शासन निर्णय दिनांक 15.05.2014 नुसार निश्चित केलेले आहे.

उपरोक्त शासन निर्णयातील प्रकरण-01 व प्रकरण-02 मध्ये संदर्भिय शासन निर्णये व शासन परिपत्रकान्वये वेळोवेळी सुधारणा करण्यांत आलेली आहे. त्यानुसार ग्राम विकास विभागाचे अधिपत्याखालील (शिक्षक संवर्ग वगळून) जिल्हा परिषदेतील गट-क व गट-ड मधील सार्वत्रिक बदली प्रक्रिया सन-2026 बाबत जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय बदल्यांचे वेळापत्रक तसेच बदली प्रक्रियेबाबत सुचना संदर्भ क्रमांक (10) दिनांक 10.01.2026 अन्वये करणेबाबत कळविण्यांत आलेले आहे.

त्याअनुषंगाने साप्रवि विभागांतर्गत संवर्गाचे अंतरिम वास्तव्य ज्येष्ठता यादया संदर्भिय शासन निर्णयातील वेळापत्रकानुसार प्रसिद्ध करणेबाबत कार्यवाही सुरु असुन अद्याप पर्यंत आपले अधिनस्त कार्यरत कर्मचारी यांचे वास्तव्य सेवा ज्येष्ठता यादया कार्यालयास प्राप्त झाल्या नाही. पंचायत समितीने वास्तव्य सेवा ज्येष्ठता यादी साप्रवि विभागास सादर करतांना पंचायत समिती अधिनस्त इतर क्षेत्रिय कार्यालयातील कार्यरत कर्मचारी यांचे सुद्धा बदली विनंती अर्ज/सुट अर्ज इत्यादी विहीत प्रपत्रात तयार करुन वास्तव्य सेवा ज्येष्ठता यादी (संवर्गनिहाय) सोबत सादर करावे.

प्रशासकीय बदलीस पात्र कर्मचारी/विनंती बदली करीता अर्ज सादर केलेल्या कर्मचाऱ्यांची वास्तव्य सेवा ज्येष्ठता यादी प्रसिद्ध करतांना यापुर्वी चे विभागात/आस्थापनेत केलेले कार्यकाल / कालावधी (विभागाचे नावासह) नमुद करण्यांत यावा. तसेच आवश्यक असल्यास सेवापुस्तकाचे पानाची छायांकित प्रत सलग्न करण्यांत यावी.

मुख्यालयाअंतर्गत/पंचायत समिती अंतर्गत सर्व क्षेत्रिय कार्यालय यांचेकडील कार्यरत कर्मचारी यांचे संवर्गनिहाय वास्तव्य यादया तसेच बदली अर्ज,सुट अर्ज इत्यादी विभागप्रमुख यांचेकडील माहितीसोबत प्राप्त होणारे अर्जाची नोंद जिल्हास्तरावर प्रसिद्ध करण्यांत येणाऱ्या वास्तव्य ज्येष्ठता यादीत घेण्यांत येईल. तसेच परस्पर प्राप्त होणारे अर्ज अर्ज विचारात घेण्यांत येणार नाही याची नोंद घ्यावी.

सदर बाब आपल्या अधिनस्त कर्मचाऱ्यांचे निदर्शनास आणुन दयावी. तसेच यापुर्वी ज्या कर्मचाऱ्यांनी विभागप्रमुख यांचेकडे अर्ज सादर न करता साप्रवि विभागास सादर केलेले आहे त्या कर्मचारी यांनी आपले अर्ज विभागप्रमुख यांचेकडे सादर करावेत व विभागप्रमुख यांनी त्यांचे अधिनस्त गट-क मधील साप्रवि विभागांतर्गत संवर्गातील कर्मचारी यांचे वास्तव्य ज्येष्ठता तसेच बदली /सुट अर्ज संवर्गनिहाय दिनांक 10.04.2026 पर्यंत आस्थापना-01 तसेच गट-ड (शिपाई) मधील कर्मचारी यांचे बदली अर्ज आस्थापना -02 साप्रवि विभागास सादर करावेत.

आपणाकडून प्राप्त होणारे वास्तव्य ज्येष्ठता तसेच बदली अर्ज यावरुन जिल्हास्तरीय अंतरिम वास्तव्य सेवा ज्येष्ठता यादी जिल्हा परिषद,वर्धा चे वेबसाईड www.zpwardha.in **तसेच** https://zpwardha.maharashtra.gov.in) तसेच कार्यालयीन ई-मेल वर प्रसिद्ध केली जाईल. त्याच प्रमाणे प्रसिद्ध करण्यांत आलेल्या अंतरिम वास्तव्य ज्येष्ठता सुचितील आक्षेप वा हरकती असल्यास संदर्भिय परिपत्रकातील दिलेल्या कालावधीत साप्रवि विभागास सादर कराव्यात.

(अमोल ज.भोसले)
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य)**
**जिल्हा परिषद, वर्धा**

**प्रत माहितीस्तव सादर :**

1. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,वर्धा.
2. मा.अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,वर्धा

सा. प्र. वि. जिल्हा परिषद ★ वर्धा ★

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य)**
**जिल्हा परिषद, वर्धा**

S/D//Sarvartrik badalya2025/ Transfer-2025